# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे विभागीय मंडळ, पुणे ४११ ००५.

## प्रकटन

क्रमांक पुविमं/माध्यमिक–क/4523
पुणे–411005.
दिनांक– 23/08/2024.

प्रति,
मुख्याध्यापक/
सर्व माध्यमिक शाळा/विद्यालय
पुणे,अहमदनगर,सोलापूर .

विषय– जुलै, 2024 मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.10 वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12 वी) परीक्षेचा निकाल जाहीर करणेबाबत.....
संदर्भ– 1. क्रमांक रां.मं./परीक्षा–2/3317 दि. 22/08/2024

उपरोक्त विषयाच्या संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने सर्व माध्यमिक शाळा /कनिष्ठ महाविद्यालये मुख्याध्यापक,प्राचार्य यांना कळविण्यात येते की, जुलै, 2024 मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.10 वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12 वी) परीक्षेचा निकाल ऑनलाईन . www.mahresult.nic.in या संकेतस्थळावर शुक्रवार दिनांक 23/08/2024 रोजी दुपारी 1.00 वाजता जाहीर करण्यात येत आहे. सदर बाब विद्यार्थी,पालक व संबधित घटकांच्या निदर्शनास आणून देण्यात यावी. सोबत संदर्भ क्र.1 चे पत्र व त्यासोबतचे प्रकटन जोडले आहे.

(औदुंबर उकिरडे )
विभागीय सचिव,
पुणे विभागीय मंडळ,
पुणे–411005.

प्रत माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीसाठी
1.विभागीय शिक्षण उपसंचालक,पुणे विभाग पुणे.
2.शिक्षणाधिकारी(माध्यमिक) जिल्हा परिषद पुणे,अहमदनगर,सोलापूर

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ००४

## प्रकटन

विषय : जुलै-ऑगस्ट २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) पुरवणी परीक्षेचा निकाल जाहीर करणेबाबत...

---

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळांमार्फत **माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) पुरवणी परीक्षा दिनांक १६ जुलै, २०२४ ते दिनांक ३० जुलै, २०२४ व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) ची पुरवणी परीक्षा दिनांक १६ जुलै, २०२४ ते ८ ऑगस्ट, २०२४ या कालावधीत** आयोजित करण्यात आली होती.

तथापि परीक्षा कालावधीत दिनांक २६/७/२०२४ रोजी राज्यातील काही जिल्हयांमध्ये अतिवृष्टीचा इशारा देण्यात आलेला होता. त्यामुळे संपूर्ण राज्यात दिनांक २६/७/२०२४ रोजी असलेल्या इयत्ता १२ वी च्या विषयांची परीक्षा दिनांक ०९/८/२०२४ रोजी व इयत्ता १० वीच्या विषयाची परीक्षा दिनांक ३१/०७/२०२४ रोजी घेण्यात आली.

सदर परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात येत असून निकालाची कार्यपध्दती व त्याच्या कार्यवाहीचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

१) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या नऊ विभागीय मंडळांमार्फत **जुलै-ऑगस्ट २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र** (इ.१० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) **पुरवणी परीक्षेचा** ऑनलाईन निकाल **www.mahresult.nic.in** व **www.mahahsscboard.in** या दोन संकेतस्थळांवर **शुक्रवार, दिनांक २३/०८/२०२४ रोजी दुपारी ०१.०० वाजता** जाहीर करण्यात येत आहे.

२) ऑनलाईन निकालानंतर लगेचच दुसऱ्या दिवसापासून माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) पुरवणी परीक्षेस प्रविष्ट झालेल्या विद्यार्थ्यास स्वत:च्या अनिवार्य विषयांपैकी (श्रेणी विषयांव्यतिरिक्त) कोणत्याही विशिष्ट विषयात त्याने संपादित केलेल्या गुणांची गुणपडताळणी व उत्तरपत्रिकांच्या छायाप्रती, पुनर्मूल्यांकनासाठी संबंधित विभागीय मंडळाकडे ऑनलाईन पध्दतीने **www.mahahsscboard.in** या संकेतस्थळावर विद्यार्थ्यांना स्वत: अर्ज करण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. यासाठी आवश्यक अटी/शर्ती व सूचना संकेतस्थळावर देण्यात आलेल्या आहेत. **गुणपडताळणी व छायाप्रतीसाठी शनिवार, दिनांक २४/०८/२०२४ ते सोमवार, दिनांक ०२/०९/२०२४ पर्यंत अर्ज ऑनलाईन पध्दतीने करता येईल.** त्यासोबतच ऑनलाईन पध्दतीने शुल्क (Debit Card/ Credit Card/ UPI/ Net Banking) याद्वारे भरता येईल.

३) जुलै-ऑगस्ट २०२४ पुरवणी परीक्षेच्या उत्तरपत्रिकेचे पुनर्मूल्यांकनासाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्यासाठी मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावरुन प्रथम उत्तरपत्रिकेची छायाप्रत घेणे अनिवार्य असून छायाप्रत मिळाल्याच्या दिवसापासून त्यापुढील कार्यालयीन कामाच्या पाच दिवसांत पुनर्मूल्यांकनाच्या कार्यपध्दतीचा अवलंब करुन विहित नमुन्यात विहित शुल्क भरुन संबंधित विभागीय मंडळाकडे विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पध्दतीने अर्ज करणे आवश्यक राहील. ज्या विद्यार्थ्यांना उत्तरपत्रिकेचे पुनर्मूल्यांकन करावयाचे असेल त्यांनी अधिक माहितीसाठी संबंधित विभागीय मंडळाकडे संपर्क साधावा.

४) फेब्रुवारी–मार्च २०२५ मधील माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इयत्ता १० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेस ज्या विद्यार्थ्यांना प्रविष्ट व्हावयाचे आहे अशा नियमित, पुनर्परिक्षार्थी विद्यार्थी, नाव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी तसेच श्रेणीसुधार योजनअंतर्गत प्रविष्ट होणारे व ITI (औद्योगिक प्रशिक्षण संस्था) द्वारे Transfer of Credit घेणाऱ्या विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने स्विकारली जातील. त्याच्या तारखा मंडळामार्फत स्वतंत्रपणे जाहीर करण्यात येतील.

५) फेब्रुवारी–मार्च २०२४ च्या इ. १० वी व इ. १२ वी परीक्षेमध्ये सर्व विषयांसह प्रथम प्रविष्ट होऊन उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना त्यांची संपादणूक सुधारण्यासाठी श्रेणी/गुणसुधार (Class Improvement Scheme) योजनेअंतर्गत परीक्षेस प्रविष्ट होण्यासाठी तरतुदींच्या अधीन राहून लगतच्या तीन संधी (जुलै–ऑगस्ट २०२४, फेब्रुवारी–मार्च २०२५ व जुलै–ऑगस्ट २०२५) उपलब्ध राहतील.

६) जुलै–ऑगस्ट २०२४ च्या इ. १० वी व इ. १२ वी परीक्षेमध्ये सर्व विषयांसह प्रथम प्रविष्ट होऊन उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांची संपादणूक सुधारण्यासाठी श्रेणी/गुणसुधार (Class Improvement Scheme) योजनेअंतर्गत परीक्षेस प्रविष्ट होण्यासाठी तरतुदींच्या अधीन राहून लगतच्या तीन संधी (फेब्रुवारी–मार्च २०२५, जुलै–ऑगस्ट २०२५ व फेब्रुवारी–मार्च २०२६) उपलब्ध राहतील.

दि. २२/०८/२०२४

(अनुराधा ओक)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे-०४.